माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५०२**

**अपिलार्थी श्री. नविन सिंग**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
सक्षम प्राधिकारी - ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, १ ला मजला, ए विंग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सक्षम प्राधिकारी - ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, १ ला मजला, ए विंग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २५.०२.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित (प्रतिनिधी)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०९.२०२४ | - | १८.१०.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०२.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थींनी दि. २१.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी (१) Please provide the information me regarding the Mr. Nitin Bandopant Salagre and the information regarding property claimed by him on his name from SRA. As it will be required in the criminal case against Mr. Nitin Bandopant Salagre (Accused) SW/192/2021 in 65th Metropolitan Magistrate court at Andrei in which lam advocate for complainant. (2) Certified copies and clear copies pd all the Annextures (i.e Annexture 1, Annexture 2 & Annexture 3), Form-A, Form-B, consent letter, Affidavits and other housing proofs and the documents related to Mr. Nitin Bandopant Salagar of Room No. 20 of the Matoshree Compound SRA CHS, Plot No. 428A, 428 A-1 to 33 and 428A/39 बाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १८.१०.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. कमलाकर बोरकर व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती (पृष्ठ क्र. १ ते ४९) ची प्रमाणित प्रत त्यांनी सुनावणी दरम्यान तयार करुन आणलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २५.०२.२०२६ रोजीच्या सहपत्रासह अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध



२२

करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी सदर माहिती स्विकारुन समाधान व्यक्त केले.

४. अपिलार्थी यांनी पुढे आयोगास सादर केले की, आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन न दिल्याबाबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) श्रीमती मंजुषा रसाळ, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी - ३ यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू.२५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसात त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Greater Mumbai *

**मुंबई**
**दिनांक : २६.०२.२०२६**

26-2-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५०२

**अपिलार्थी श्री. नविन सिंग**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
सक्षम प्राधिकारी- ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंतर काणेकर मार्ग, १ ला मजला, ए विंग, वांद्रे (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सक्षम प्राधिकारी- ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंतर काणेकर मार्ग, १ ला मजला, ए विंग, वांद्रे (पू), मुंबई-५१

**(In continuation of order dtd २६.०२.२०२६)**

उक्त प्रकरणी आयोगाने दि. २६.०२.२०२६ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:-

१) *"श्रीमती मंजुषा रसाळ, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी- ३ यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसात त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.*

२) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. २६.०२.२०२६ रोजीच्या अनुषंगाने श्रीम. मंजुषा रसाळ, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी- ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी दि. २१.०४.२०२६ रोजी खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

*"अर्जदार यांचे मागणीनुसार संबंधित कागदपत्रांच्या प्रती तयार ठेवण्यात आल्या होत्या. परंतु श्री. चैतराम इठोले, सहाय्यक जन-माहिती अधिकारी यांचेशी झालेल्या वादामुळे अर्जदार यांनी सदरची माहिती न घेताच ते कार्यालयातून निघून गेले. तसेच त्यांनी पुन्हा या कार्यालयाशी संपर्क न करता त्यांनी श्री. चैतराम इठोले, सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करणेसाठी आपले कार्यालयाकडे अपील दाखल केले आहे.*

*तद्नंतर श्रीम. मंजुषा रसाळ जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०२.२०२६ रोजी अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती विनामुल्य पुरविलेली आहे. सदर माहिती अपीलार्थी यांनी स्वीकारली असून समाधान व्यक्त केले आहे. तरी श्रीम. मंजुषा रसाळ जन-माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कारवाई करण्यात येऊ नये अशी नम्र विनंती आहे."*

..२/-

श्रीम. मंजुषा रसाळ, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सक्षम प्राधिकारी-३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब आदेश पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन दि. २६.०२.२०२६ रोजीच्या आयोगाच्या आदेशानुसार प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे. सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२६**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

29-5-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**